कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना
टोल फ्रि क्रमांक १०६४
कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२

:: प्रेस नोट :: दिनांक :- ०३/०६/२०१९.

**पंचायत समीती मंठा चे विस्तार अधिकारी श्री .आत्माराम आसाराम चव्हाण व कनिष्ठ अभियंता श्री .स्नेहल विनायक भोसले यांना २०,०००/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक. 1)श्री. आत्माराम आसाराम चव्हाण वय 50 वर्षे व्यवसाय नौकरी विस्तार अधिकारी ,पंचायत समीती मंठा. रा. हनुमंतखेडा ता.जाफ्राबाद जि.जालना .ह.मु. प्लॉट नं.107 आनंद नगर ,मंठा बायपास, जुना जालना.<br>आरोपी लोकसेवक 2)श्री.स्नेहल विनायक भोसले वय36 वर्षे व्यवसाय नौकरी कनिष्ट अभियंता .घरकुल विभाग पंचायत समीती मंठा (कंत्राटी)रा. दिशासंस्कृती फ्लॅट404.A/4 यां पैठण रोड औरंगाबाद .ह.मु.व्हि.एस.एस कॉलेज जवळ माने यांचे येथे किरायाने स्टेशन रोड, जालना . |
| २ | गुन्हा घडला तारीख, वेळ व ठिकाण | :- | दि.०३.०६.२०१९ रोजी हॉटेल आकृती ,तळणी फाटा , जालना मंठा हायवे रोड ,मंठा येथे |
| ३ | लाचेची रक्कम | :- | २०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारली. |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.आर.डी.निकाळजे. पोलीस उप अधिक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, यातील तक्रारदार यांचे सरपंच पदाचे कार्यकालात गावात झालेल्या घरकुल व शौचालयाच्या बांधकामाचे चौकशीत तक्रारदार यांचे विरुध्द खोटा चौकशी अहवाल तयार करुन सदर प्रकरणात अडकवितो असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे आलोसे. क्र. १ यांनी आ.लो.से. क्र. २ यांचे मार्फतीने मागणी केली व आलोसे क्र. २ यांनी तक्रारदार यांना तुम्हाला पैसे द्यावे लागतील नाहीतर तुमच्या विरुध्द कार्यवाही होईल असे म्हणाले तेंव्हा तक्रारदार यांची आलोसे क्र. १ .व आलोसे. क्र. २ यांना लाच द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे दि.३०.०५.२०१९ रोजी तक्रार नोंदवली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.३०.०५.२०१९ रोजी व आज दि. ०३.०६.२०१९ रोजी ला.प्र.विभागाने विस्तार अधिकारी श्री. चव्हाण व कनिष्ट अभियंता श्री. भोसले यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान विस्तार अधिकारी श्री. चव्हाण व कनिष्ट अभियंता श्री. भोसले यांनी तक्रारदार यांचे सरपंच पदाचे कार्यकालात गावात झालेल्या घरकुल व शौचालयाच्या बांधकामाचे चौकशीत तक्रारदार यांचे विरुध्द खोटा चौकशी अहवाल तयार करुन सदर प्रकरणात न अडकविण्याकरिता तक्रारदार यांचेकडे ४०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन, हॉटेल आकृती ,तळणी फाटा . जालना मंठा हायवे रोड ,मंठा येथे स्विकारण्यास तयार झालेचे निष्पन्न झाले.

त्यावरुन आज दि.०३.०६.२०१९ रोजी आलोसे.क्र.१)विस्तार अधिकारी श्री. चव्हाण व आलोसे क्र. 2) कनिष्ठ अभियंता श्री. भोसले. यांचे विरुध्द त्यांचे पंचायत समिती मटा व हॉटेल आकृती ,तळणी फाटा . जालना मंठा हायवे रोड ,मंठा येथे लाचेचा सापळा आयोजीत केला असता आलोसे.क्र.१)विस्तार अधिकारी श्री. चव्हाण यांनी आलोसे क्र. 2) कनिष्ठ अभियंता श्री. भोसले यांचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडुन त्यांचे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष २०,०००/- रुपयाची लाच स्विकारली असातांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आलेले असुन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.८९७५७६२९०६, पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना